शूक्रवार दि.२३ ऑगस्ट२०२४
किंमत २ रुपये । महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०१ अंक : ३५४
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

दैनिक बीड लोकनेता
जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ
मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

Email : elokneta@gmail.com Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 www. lokneta.com

# पत्रकारांच्या जीवनात स्थैर्य आणू पत्रकार संवाद यात्रेची मुंबईमध्ये सांगता

## मुख्यमंत्र्यांबरोबर बैठक घेऊन निर्णय करू–चंद्रकांतदादा पाटील

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

मुंबई (वृत्तसंस्था)

''येत्या ८ दिवसात मुख्यमंत्र्यांची वेळ घेऊ. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या पदाधिकाऱ्यांसोबत स्वतंत्र बैठक आयोजित करू. पत्रकारांच्या जीवनात स्थैर्य कसे आणता येईल, ह्याबद्दल निर्णय घेऊ,'' असे आश्वासन उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांतदादा पाटील ह्यांनी केले. पत्रकार आणि पत्रकारांचे नेते म्हणूनही संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे ह्यांना चांगले भवितव्य असल्याचे त्यांनी सूचित केले.



पत्रकारांच्या विविध मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाने दीक्षाभूमी (नागपूर) ते मंत्रालय (मुंबई) पत्रकार संवाद यात्रा काढली. दि. २८ जुलैस सुरू झालेल्या ह्या यात्रेची सांगता आज मुंबईतील यशवंतराव चव्हाण सेंटरमध्ये झाली. त्यानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून श्री. पाटील बोलत होते. पर्यटनमंत्री मंगलप्रभात लोढा, विधानपरिषदेच्या सदस्य पंकजा मुंडे, श्री. वसंत मुंडे ह्या वेळी उपस्थित होते.

श्री. वसंत मुंडे यांनी प्रास्ताविकपर भाषणात सर्व मागण्या मांडल्या. कार्यक्रमास पत्रकार संघाचे राज्य संघटक संजय भोकरे, सरचिटणीस डॉ. विश्वास आरोटे, समन्वयक संतोष मानूरकर, कार्याध्यक्ष प्रवीण सपकाळे, डिजिटल मिडिया प्रमुख सिद्धार्थ भोकरे, ज्येष्ठ संपादक किसनभाऊ हासे, विभागीय अध्यक्ष वैभव स्वामी (मराठवाडा), नितीन शिंदे (कोकण), नीलेश सोमाणी (विदर्भ) सुभाष डोके (पश्चिम महाराष्ट्र), राजेंद्र कोरके पाटील (पुणे), अनिल रहाणे (उत्तर महाराष्ट्र), कोकण विभागाचे कार्याध्यक्ष शैलेश पालकर, जिल्हाध्यक्ष नयन मुंडे (अमरावती), डॉ. प्रभू गोरे (छत्रपती संभाजीनगर), प्रसिद्धिप्रमुख नवनाथ जाधव, प्रसिद्धी समन्वयक भगवान राऊत, राज्य सदस्य संजय फुलसुंदर आदी उपस्थित होते.

'तुमच्या सगळ्या मागण्यांवर योग्य मार्ग काढू,' असा दिलासा देताना श्री. चंद्रकांतदादा म्हणाले, ''ग्रामीण महाराष्ट्रातील पत्रकारांच्या समस्या संवाद यात्रेच्या माध्यमातून मी समजावून घेतल्या. श्री. वसंत मुंडे ह्यांच्या प्रस्ताविकातूनही त्या कळाल्या. मुख्यमंत्र्यांची वेळ घेऊन आठ दिवसांत स्वतंत्रपणे बैठक घेऊ. मागण्यांवर सविस्तर चर्चा करू आणि मार्ग काढू.''

अलीकडच्या काळात माध्यम क्षेत्र असंघटितांचे क्षेत्र झाले आहे. ह्या क्षेत्रात काम करणाऱ्यांसाठी विद्यावेतन, आरोग्यविमा, पेन्शन, आजारपणामध्ये मदत या माध्यमांतून त्यांच्या जीवनात स्थैर्य कसे आणता येईल, यासाठी सरकार प्रयत्न करील, असेही श्री. चंद्रकांतदादा म्हणाले. जिल्हा दैनिकांसाठी स्वतंत्र जाहिरात धोरण राबविण्यात येईल, असे स्पष्ट करून श्री. पाटील म्हणाले, ''पत्रकारांसाठी स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याची सूचनाही करण्यात येईल. राज्यसभा आणि विधानपरिषद येथे पत्रकारांचा प्रतिनिधी घेण्याची तरतूद होईल, तेव्हा त्या विषयावर बोलणे उचित राहील. एक मात्र सांगतो, वसंतरावांना चांगले भवितव्य आहे! ''

श्री. मंगलप्रभात लोढा म्हणाले, ''पत्रकार संवाद यात्रेच्या समारोप कार्यक्रमास तुम्ही आवर्जून उपस्थित राहा, अशी सूचना मला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे ह्यांनी दिली. त्यांच्या आज्ञेनुसार कार्यक्रमास आलो. तुमचा निरोप मी उपमुख्यमंत्र्यांपर्यंत पोहोचविन. मुख्यमंत्री तथा उपमुख्यमंत्री मुंबईला आल्यानंतर या संदर्भात बैठक घेऊ. पत्रकारांना नक्कीच न्याय मिळेल.''

यात्रा आणि परिवर्तन

पंकजा मुंडे म्हणाल्या, ''दीक्षाभूमी ते मंत्रालय पत्रकार संवाद यात्रा काढल्याबद्दल मी वसंत मुंडे ह्यांचे अभिनंदन करते. त्याचे कारण म्हणजे अशा प्रकारच्या यात्रा फक्त मुंडे ह्यांनाच चांगल्या जमतात! गोपीनाथरावांनी संघर्ष यात्रा काढली होती. त्यानंतर राज्यात सत्तापरिवर्तन झाले. मीही पुन्हा एक संघर्षयात्रा काढली. तेव्हाही राज्यात सत्ता बदलली. आता वसंतरावांनी पत्रकार संवाद यात्रा काढली आहे. ही यात्रा मात्र आमचे सरकार कायम ठेवणारी ठरेल आणि पत्रकारांच्या जीवनात परिवर्तन घडवून आणील.''

श्री. वसंत मुंडे ह्यांनी सर्व मागण्या मांडल्या. एक-एक पत्रकार म्हणजे मतांचा गठ्ठा आहे, ह्याचा सरकारने विचार करावा असा इशारा देऊन ते म्हणाले, ''सरकारने आमच्याकडे दयेच्या आणि मायेच्या भूमिकेतून पाहावे अशी विनंती आहे. राज्य प्रेस कौन्सिलची निर्मिती करावी, अर्थसंकल्पात पत्रकारांसाठी तरतूद करावी, ह्या आमच्या प्रमुख मागण्या आहेत.''

श्री. संजय भोकरे म्हणाले, ''पत्रकार चांगल्या प्रकारे संवाद साधू शकतो, हे पत्रकारांनी संवाद यात्रेच्या माध्यमातून दाखवून दिले. आपली संघटना टिकली पाहिजे. आपण सर्व जण संघटित आहोत हे आज तुम्ही तुमच्या उपस्थितीने सरकारला दाखवून दिले.'' श्री. राहुल गिरी ह्यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. विश्वास आरोटे ह्यांनी आभार मानले.

# विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमी वर राज ठाकरे यांचा बुलढाणा दौरा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

सिंदखेड राजा । प्रतिनिधी




महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष सन्माननीय राज ठाकरे तसेच मनसे नेते मनविसे अध्यक्ष अमित ठाकरे हे विधानसभा निवडणुकीच्या संदर्भात आढावा बैठकिस उपस्थित राहणार आहेत. कार्यकर्त्यांमध्ये ऊर्जा निर्माण करण्यासाठी येत असून दि.२५ ला श्री संत गजानन महाराज शेगाव या नगरीत आगमन होणार असून बुलढाणा जिल्ह्यातील प्रत्येक विधानसभा मतदारसंघनिहाय चर्चा सत्र व बैठकीचे आयोजन केले आहे त्या अनुषंगाने बुलढाणा जिल्ह्यातील सर्व पदाधिकाऱ्यांसोबत पक्षाच्या बाबतीत विचार विमर्श करण्यात येणार आहे,त्याचप्रमाणे कोणत्या मतदारसंघात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा प्रभाव जास्त आहे याबाबतीत पदाधिकाऱ्यांची मते जाणून घेणार, तसेच पदाधिकाऱ्यांसोबत चर्चा करून इच्छुक उमेदवारांची नावावर चर्चा देखील होणार आहे व या नंतर पक्षाची ध्येय धोरणे सामान्य जनतेपर्यंत कसे पोहोचतील,उत्कृष्ट कामगिरी प्रत्येक मतदारसंघात महाराष्ट्र निर्माण सेनेची कशी होईल याबाबत राज साहेब ठाकरे पदाधिकाऱ्यांसोबत चर्चा करून निवडणुकीच्या बाबतीत व मतदार संघाच्या बाबतीत दिशा स्पष्ट करणार आहे.त्यामुळे बुलढाणा जिल्ह्यातील प्रत्येक मतदारसंघ निहाय बुलढाणा जिल्ह्यातील महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी आढावा बैठकीला आवर्जून उपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हाध्यक्ष शिवा दादा पुरंदरे यांनी केले आहे.

# कोलकता आणि बदलापुर घटनेची फास्ट ट्रॅक कोर्टात प्रकरणे चालवून आरोपींना फाशीची शिक्षा देण्यात यावी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

धर्माबाद । साहेबराव दुगाने



कोलकता येथील अत्याचार त्या पाठोपाठ ठाणे जिल्हयातील बदलापुर येथील दोन्हीही अत्याचाराची घटना माणुसकीला काळीमा फासणारी आहेत.ही प्रकरणे फास्ट ट्रॅक कोर्टात चालवून आरोपींना फाशीची शिक्षा देण्यात यावी अशी मागणी जिजाऊ ब्रिगेड व समस्त महिला मंडळ धर्माबाद च्या वतीने निवेदना द्वारे करण्यात आली आहे.

तहसिलदार धर्माबाद यांच्याकडे आज निवेदन देण्यात आले. यावेळी उपस्थित शिवमती जयश्री शिंदे, शिवमती पार्वती कदम ,शिवमती प्रणिता ठाकरे ,शिवमती सुचिता कात्रे, शिवमती लक्ष्मी बेलुरवाड ,शिवमती शोभाताई शिंदे ,शिवमती सुनिता, सौ मीना राजू भद्रे, राजश्रीताई पाटील ,आंबुलकोट ताई ,अनुसया नारमोड, आदी उपस्थिती होती

दोन्ही घटनेचा तीव्र निषेध करण्यात आला. माता भगिनी ची सुरक्षा करून त्यांना संरक्षण मिळण्यासाठी उशीर होत असल्याने अशा घटना घडत आहेत.दोन्ही प्रकरणातील आरोपींना फाशीची शिक्षा देण्यात यावी व हे प्रकरण फास्ट ट्रॅक कोर्टात चालवण्यात यावे फाशीची शिक्षा देण्यात यावी आरोपीस फाशीची शिक्षा न झाल्यास जिजाऊ ब्रिगेड व समस्त धर्माबाद तालुका महिला मंडळाच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा जिजाऊ ब्रिगेड च्या वतीने देण्यात आला.

# राष्ट्रसंत भगवानबाबा समाज प्रबोधन महाराष्ट्र भुषण पुरस्कार जाहीर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

बुलढाणा । प्रतिनिधी







वंजारी महासंघ महाराष्ट्र राज्य साहित्य आघाडी च्या वतीने जगत् विख्यात तत्वज्ञानी थोर समाजसुधारक प्रबोधनकार, राष्ट्रसंत भगवानबाबा समाज प्रबोधन, महाराष्ट्र भुषण पुरस्कार २०२४ जाहिर करण्यात आला आहे. वार रविवार दिनांक २५/८/२०२४ रोजी गंगा लान्स राष्ट्रसंत भगवानबाबा चौक निर्मल नगर अहमदनगर येथे संपन्न होणार आहे.

वंजारी समाजाच दुसर राज्यस्तरीय मराठी साहित्य संमेलन होणार आहे. संमेलनाच्या अध्यक्षस्थानी डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ गजानन सानप, स्वागताध्यक्ष आंतरराष्ट्रीय कुस्ती पटू राजकुमार आघाव, तर सह स्वागताध्यक्ष रेणुका वराडे, प्रदेशअध्यक्षा साहित्य आघाडी रेखा शेळके संखे, राजकुमार आघाव राज्य सचिव, प्रा.वा.ना.आंधळे खानदेश कवी लेखक मार्गदर्शन, गणेश खाडे विचारवंत साहित्यिक, लेखक आध्यात्मिक मार्गदर्शन तथा संस्थापक अध्यक्ष वंजारी महासंघ सह अनेक मान्यवर उपस्थित सोहळा संपन्न होणार आहे. त्या अनुषंगाने आपण दैनिक सोमेश्वर साथी चे संपादक बालासाहेब फड परळी वैजनाथ जिल्हा बीड, सह संपादक मोहन आखाडे दैनिक जनमत संभाजीनगर, संपादक दत्ता जाएभाये सा. वंजारी पुकार किनवट, संपादक ज्ञानेश्वर बुधवंत दै.लोकनेता बुलढाणा, संपादक नितीन ढाकणे दै. अतुल्य महाराष्ट्र परळी वैजनाथ जिल्हा बीड, संपादक निलेश पुराणिक सा. लक्षवेध बीड यांनी दैनिकाच्या माध्यमातून करीत असलेली लोकजागृती पहाता आपल्या अदभुत व अलौकिक कार्य बद्दल आपणास जगत विख्यात तत्वज्ञानी थोर समाजसुधारक प्रबोधनकार राष्ट्रसंत भगवानबाबा समाज प्रबोधन महाराष्ट्र भुषण पुरस्कार २०२४ देऊन गौरविण्यात येणार आहे.

# श्रीमती द्रोपदी मुर्मू राष्ट्रपती यांना सिंदखेड राजा येथे तहसीलदार यांच्या मार्फत दिले निवेदन



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

सिंदखेड राजा । ज्ञानेश्वर बुधवत

सुप्रीम कोर्टाच्या सात न्यायाधीशांच्या खंडपीठाने एक ऑगस्ट २०२४ ला अनुसुचित जाती आणि अनुसूचित जमातीच्या नोकरीच्या आरक्षणामध्ये उपवर्गीकरण करणे आणि क्रिमिलियर लावणे बाबत दिलेल्या संपूर्ण निर्णयाला रद्द करण्यात यावे साठी सिंदखेड राजा तहसीलदार यांच्या मार्फत श्रीमती द्रोपदी मुर्मु यांना आज भारत बंद च्या पार्श्वभूमीवर निवेदन देण्यात आले

भारतीय संविधानानुसार या आरक्षणामध्ये कोणताही बदल करता येत नसून तसेच त्याचे उपवर्गीकरण करता येत नाही.

आणि त्याला क्रिमिलियर सुद्धा लावता येत नाही. त्यामध्ये बदल करण्याचा अधिकार फक्त भारताच्या राष्ट्रपती यांनाच आहे. परंतु एक ऑगस्ट २०२४ ला सर्वोच्च न्यायालयातील सात न्यायाधीशांच्या खंडपीठाने संविधान विरोधी व राष्ट्रपतींच्या अधिकाराविरुद्ध अनुसूचित जाती आणि जमातीच्या नोकरीमध्ये उपवर्गीकरण आणि क्रिमिलियर लावण्याचे असंवैधानिक मत आणि निरीक्षण नोंदवले आहे.सर्वोच्च न्यायालयाने अशा प्रकारचे मत नोंदवून अनुसूचित जाती आणि जमातीच्या समुदायांवर एक प्रकारचा अन्यायच केला आहे.

न्यायाधीशांच्या खंडपीठाचा संपूर्ण निर्णय रद्द करून अनुसूचित जाती आणि जमातीच्या आरक्षणामध्ये पूर्वीपासून चालत आलेल्या आरक्षण पद्धतीमध्ये कोणताही बदल करण्यात येऊ नये. तसेच संसदेचे विशेष अधिवेशन बोलावून लोकसभा आणि राज्यसभेच्या दोन्ही सभागृहांमध्ये अनुसूचित जाती आणि जमातीच्या आरक्षणामध्ये कोणताही बदल करण्यात येणार नाही, असा कायदा करावा.

संसदेत विशेष अधिवेशन बोलावून पास करन्यात यावे यासाठी आज दिनांक २१ ऑगस्ट रोजी निवेदन देण्यात आले यावेळी अनिल काकडे सरपंच, राजेश इंगळे सरपंच ,माणिक जाधव सरपंच,रामदास कहाळे ,भिमशहीर गौतम जाधव, संतोष म्हस्के, अशोक खरात, सिद्धार्थ काहाळे , बाबसाहेब जाधव यांच्या सह कार्यकर्ते हजर होते.

## चारोळी

एकीचे बळ दाखव सखी
अंधाराला घाबरतेस कशाला
तू ही जन्मदात्री, आधीशक्ती
मग उगाच कोरड कसली घशाला.

रंजना सानप
मायणी (सातारा)

# डॉक्टरांच्या सुरक्षेसाठी आयएमएची ठाम मागणी;आरोग्यमंत्री जेपी नड्डा यांना पत्र

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

मुंबई (वृत्तसंस्था)

कोलकाता येथील महिला डॉक्टरच्या हत्येच्या निषेधार्थ देशभरात सुरू असलेल्या डॉक्टरांच्या संपादरम्यान इंडियन मेडिकल असोसिएशनने (आयएमए बुधवारी केंद्रीय आरोग्यमंत्री जेपी नड्डा यांना पत्र लिहून अनेक महत्त्वाच्या मागण्या केल्या आहेत. आयएमएने या पत्रातून डॉक्टरांच्या सुरक्षेचा मुद्दा उपस्थित केला असून, यासाठी त्वरित कायदा करण्याची मागणी केली आहे.आयएमए ने जेपी नड्डा यांना विनंती केली आहे की, महामारी रोग सुधारणा कायदा, २०२० चा सुधारित भाग आणि केरळ सरकारच्या कोड ग्रे प्रोटोकॉल विधेयक २०१९ च्या मसुद्यात समाविष्ट करण्यात यावा. आयएमएने म्हटले आहे की, मसुदा विधेयक २०१९ मध्ये महामारी रोग सुधारणा कायदा, २०२० आणि केरळ सरकारच्या कोड ग्रे प्रोटोकॉलचा सुधारित भाग समाविष्ट करावा, ज्यामुळे भारतातील डॉक्टरांच्या मनात विश्वास निर्माण होईल.

# वैद्य हॉस्पिटल नांदेड येथे ज्येष्ठ नागरिकासाठी वयश्री व तीर्थक्षेत्र दर्शन योजनेचे शिबिर संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव गायकवाड**

दि.२२ ऑगस्ट २०२४ रोजी एस पी ऑफीस समोरील डॉ.वैद्य हॉस्पिटल नांदेड येथे डॉ.हंसराज वैद्य यांनी गोरगरीब जनतेची एकदम माफक दरात अत्यंत काळजीपूर्वक प्रामाणिकपणे अनेक वर्षापासून वैद्यकीय सेवा पुरवतात डॉ.हंसराज वैद्य यांनी जनतेची सेवा करून मने जिंकली व जनतेच्या मनात प्रामाणिकपणाचे घर निर्माण केले आणि ज्येष्ठ नागरिकांशी जास्त संपर्क झाल्यामुळे ज्येष्ठ नागरिकांच्या खूप समस्या त्यांच्याकडे येत होत्या त्यामुळे ज्येष्ठ नागरिकांसाठी आपण काय केलं पाहिजे व काय करता येईल याविषयी विचार केला आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी इतर काही राज्यात ६० वर्षाच्या वर जेष्ठ नागरिक मानलं जाते आणि ३५०० रु. महिना दिला जातो

यामुळे त्यांनी अनेक वर्षापासून हे काम एका व्यक्तीने होत नाही म्हणून त्यांनी ज्येष्ठ नागरिकांचे अनेक संघ निर्माण करून खूप मोठं संघटन निर्माण केलेलं आहे हे संघटन निर्माण करून ज्येष्ठ नागरिकांच्या अनेक विविध मागण्या संदर्भात संघर्ष करत आहेत संघर्ष पाहून आज काही दिवसापासून चालू असलेल्या वयश्री योजना व तीर्थ दर्शन योजना या योजनेचे शिबिर डॉ.हंसराज वैद्य वजीराबाद नांदेड येथे आयोजीत करण्यात आले होते शिबिराला उपस्थित सहायक समाज कल्याण आयुक्त मा.शिवानंद मिनगिरे , विधी सेवा प्राधिकरण नांदेड च्या जेज दलजीत कौर मॅडम, सुभाष रावजी बारहळे, ज्येष्ठ नागरिक नेते वैद्यकीय, साहित्यिक, डॉ. हंसराज वैद्य , डॉ.शितल भालके, प्रभाकर कुंटूरकर, माधवरावजी पवार, आणि मान्यवरांच्या मार्गदर्शनाखाली ज्येष्ठ



नागरिकांसाठी शिबिर आयोजित करण्यात आलं होतं या शिबिराला अनेक ज्येष्ठ महिला जेष्ठ पुरुष उपस्थित होते शिबिराचे मुख्य मार्गदर्शक सहाय्यक समाज कल्याण अधिकारी मिनगिरे यांनी ज्येष्ठ नागरिकांना वयश्री योजनेत जास्त चे खर्चिक कागदपत्राची अट न ठेवता आधार कार्ड, किंवा मतदान कार्ड, राशन कार्ड , हाफ फोटो, पासबुक आणि उत्पनाचे स्वयंघोष प्रमाणपत्र हे कागदपत्र अनिवार्य केलेले आहे आणि तीर्थ दर्शन या योजनेसाठी वरील कागदपत्र आणि एक वैद्यकीय प्रमाणपत्र अणीवार्य केले आहे इतर काही अडचणी असल्यास सहाय्यक समाज कल्याण आयुक्त कार्यालय नांदेड या ठिकाणी माहितीसाठी संपर्क करावे असे आवाहन सहायक आयुक्त यांनी केले नागरिकांच्या अडीअडचणी त्यांच्या सोयी सुविधा व इतर ज्येष्ठ नागरिकांना महिन्याला साडेतीन हजार रुपये मानधन देण्यात यावे कारण या जेष्ठ नागरिकांना कोणतेही काम होत नाही आणि काही मुलं त्यांच्या वडिलांना पोसत सुद्धा नाहीत त्यामुळे जेष्ठ नागरिकांची परिस्थिती अवस्था खूप बेकार होऊन बसली आहे म्हणून ज्येष्ठ नागरिकांच्या विविध मागण्यासाठी शिबिर आयोजित करण्यात आलं होतं शिबिराचे मुख्य आयोजक ज्येष्ठ नागरिकांचे संघर्ष नेते डॉ. हंसराज वैद्य, वैद्य हॉस्पिटल वजीराबाद नांदेड यांनी आयोजित केले होते.

# सराईत गुन्हेगाराची एक वर्षासाठी हर्सुल कारागृहात रवानगी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव गायकवाड**

मा.पोलीस अधीक्षक,नांदेड यांनी नांदेड जिल्हयातील गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी नांदेड जिल्हातील सक्रिय तसेच वारंवार गुन्हे करणारे आरोपीची योजना तयार करुन आरोपीविरुध्द प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासंबंधाने सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना सुचना दिलेल्या होत्या. नांदेड जिल्हयातील गुन्हेगारावर वारंवार प्रतिबंधात्मक कार्यवाही करुन सुध्दा त्यांचे वर्तणात सुधारणा होत नसल्याने अशा गुन्हेगांराना स्थानबध्द तसेच हद्दपार करण्यासंबंधाने कार्यवाही चालु आहे.



महाराष्ट्र पोलीस अधिनियमाचे विविध कलमान्वये १७९ प्रस्तावावर हद्दपारीची कार्यवाही चालु आहे. सन २०२३ मध्ये २६ टोळ्यामधील ७९ इसमांना तसेच सन २०२४ मध्ये ०६ टोळ्यामधील २२ इसमांना असे एकुण १०१ इसमांना नांदेड जिल्हयाचे बाहेर हद्दपार करण्यात आले आहे. एम.पी.डी.ए.अंतर्गत १७ सराईत आरोपीतांना कारागृहामध्ये स्थानबध्द करण्यात आले आहे.

पोलीस ठाणे नांदेड ग्रामिण यांचेकडुन सराईत गुन्हेगार नामे सतिष ऊर्फ चिमण्या नायबराव हंबर्डे, वय २२ वर्ष, राहणार विष्णुपुरी, नांदेड याचेवर चोरी करणे, जबरी चोरी, अवैद्यरित्या हत्यार बाळगणे व वापर करणे अशा प्रकारचे गंभीर स्वरुपाचे एकुण १० दखलपात्र गुन्हे दाखल असल्याने त्याचे विरुध्द एम.पी.डी.ए. अधिनियमाप्रमाणे प्रस्ताव मा.पोलीस अधीक्षक, नांदेड यांचेकडे प्राप्त झाला होता.मा. श्री अबिनाश कुमार, पोलीस अधीक्षक, नांदेड यांनी सदर एम.पी.डी.ए. प्रस्तावमधील आरोपीस एक वर्षाकरीता स्थानबध्द करण्याबाबतची शिफारस मा. जिल्हादंडाधिकारी, नांदेड यांचेकडे केली होती. त्यावरुन मा. श्री अभिजित राऊत, जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, नांदेड यांनी सदर प्रस्तावातील गुन्हेगार हा धोकादायक व्यक्ती असल्याने आरोपी नामे सतिष ऊर्फ चिमण्या नायबराव हंबर्डे, वय २२ वर्ष, राहणार विष्णुपुरी, नांदेड यास एक वर्षाकरीता हर्सल मध्यवर्ती कारागृह, छत्रपती संभाजीनगर येथे एम.पी.डी.ए.कायद्याअंतर्गत स्थानबध्द करण्याबाबतचे आदेश पारीत केले आहे. नमुद आरोपीस मध्यवर्ती कारागृह, छत्रपती संभाजीनगर येथे एक वर्षासाठी स्थानबध्द केले आहे. यापुर्वी नांदेड जिल्हयातील १७ गुन्हेगांराना एम.पी.डी.ए. कायद्याअंतर्गत एक वर्षासाठी कारागृहात स्थानबध्द केले होते, आता ती संख्या १८ झाली आहे.

# महात्मा बसवेश्वर हे परिवर्तनवादी सूर्य : विद्यासागर डोरनाळीकर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उदगीर । प्रतिनिधी**




महात्मा बसवेश्वर हे मानवतेच्या कल्याणासाठी लढा देणारे व मानवी मुल्यांना कृतीत उतरविणारे खरे लाढवय्ये समाजसुधारक होते असे प्रतिपादन ग्रंथ सेवा देणारे सामाजिक कार्यकर्ते विद्यासागर डोरनाळीकर यांनी केले. उदगीर वीरशैव समाजाच्या वतीने धर्मवीर संग्रामप्पा शेटकार यांच्या ८५ वा स्मृतिदिनानिमित्त आयोजित ९० वा वचन सप्ताहात शनिवारी तिसरे पुष्प गुंफण्यात आले. यावेळी ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवाजी महाविद्यालयातील राज्यशास्त्राचे प्राध्यापक डॉ. विश्वभंर गायकवाड होते. यावेळी विचारपीठावर हणमंतराव औरादे उपस्थित होते. प्रारंभी महात्मा बसवेश्वर व धर्मवीर संग्रामप्पा शेटकार यांच्या प्रतिमेस प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून दीपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी आपले विचार व्यक्त करताना विद्यासागर डोरनाळीकर यांनी, तथागत गौतम बुध्दानंतर व्यवस्थेच्या व ब्राम्हणशाहीच्या विरोधात क्रांती करणारे खरे पुरोगामी विचाराचे समाजसुधारक महात्मा बसवेश्वर होते. त्यांनी अनुभव मंडपाच्या माध्यमातून भेदाभेद नष्ट करून समानतेची संस्कृती निर्माण केली. कर्मकांडाला विरोध करून विज्ञान व विवेक लोकांमध्ये रुजवला असे सांगितले. अध्यक्षीय समारोपात प्रा. डॉ. विश्वभंर गायकवाड यांनी, कायक वे कैलास व दासोह हे नीट समजून घेतले तर शोषण विरहित समाज निर्माण होईल. आपण बुद्धी व विवेक जागृत ठेवून प्रत्येक गोष्टींची चिकित्सा केली पाहिजे. महापुरुषांचे विचार आचरणात न आणता केवळ ढोंग करणे हे महापुरुषांच्या विचारांची फसवणूक आहे. बाराव्या शतकात महात्मा बसवेश्वर यांनी अनुभव मंडपात पहिल्यांदा लोकशाही रुजवली व माणसांना माणसाचे हक्क दिले. त्यांनी मानवतेचा पुरस्कार केला म्हणून ते मानव हिताचे खरे उपदेशक व सुधारक आहेत असे सांगितले.प्रास्ताविक व सुत्रसंचालन अॅड. महेश मळगे यांनी केले. आभार प्रा. डॉ. मल्लेश झुंगा यांनी मानले. कार्यक्रमास समाजबांधव उपस्थित होते.

## परळी व आष्टी येथे होणाऱ्या कृषी महोत्सावाचे स्वागत

# पण त्या मध्ये हमी भाव आणि विमा कंपनीचे स्टॉल गरजेचे-भाई विष्णुपंत घोलप

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पाटोदा । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात परळी येथे २१ ऑगस्ट-२०२४ पासून कृषी महोत्सव तसेच आष्टी येथे २९ ऑगस्ट-२०२४ पासून कृषी प्रदर्शन होत आहे. त्या बद्दल बीड जिल्ह्यातील भारतीय शेतकरी कामगार पक्ष दोन्ही आयोजकांचे स्वागत करत आहे. परंतु शेतकऱ्यांना हमी भावाबद्दल माहिती आणि विमा कंपनी बद्दल माहिती देणारे स्टॉल(कार्यालय) या ठिकाणी असावेत तरच कृषी महोत्सव आणि कृषी प्रदर्शनाचा खरा लाभ शेतकऱ्यांपर्यंत पोहचेल असे मत भारतीय शेतकरी कामगार पक्षाचे बीड जिल्हा चिटणीस भाई विष्णुपंत घोलप यांनी आमच्या दैनिक लोकनेता प्रतिनिधीशी बोलताना व्यक्त केले. बीड जिल्ह्यातील पुर्वेकडे कृषी मंत्र्यांच्या विधानसभा मतदार संघात राज्यस्तरीय कृषी महोत्सव होत आहे. तर बीड जिल्ह्याच्या पश्चिमेकडे माजी आमदार यांच्या पुढाकारातुन राज्यस्तरीय कृषी प्रदर्शन होत आहे. या कार्यक्रमामुळे शेतकरी आणि शेतीला जोडधंदा असणाऱ्या समुहाचे फायदे होतील असे आयोजकांना वाटत आहे. त्यांचे आम्ही भारतीय शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने स्वागत करतो. परंतु त्या कृषी महोत्सव किंवा कृषी प्रदर्शनात शेतकऱ्यांच्या हमी भावासाठी माहिती देणारे कार्यालय (स्टॉल)असल्यास शेतकऱ्यांना उत्पादन खर्चावर हमी भाव कसा देण्यात येतो याची सविस्तर माहिती मिळेल. आज उदा.दाखल सोयाबीन चा विचार केला तर सोयाबीनचा उत्पादन खर्च किती? कोणत्या कृषी विद्यापिठाने तो तयार केला, त्यांनी राज्याच्या कृषीमुल्य आयोगाकडे केंव्हा पाठविला आणि राज्य कृषीमुल्य आयोगाकडून राष्ट्रीय कृषीमुल्य आयोगाकडे केंव्हा पाठविण्यात येतो. केंद्रीय स्तरावर हमी भाव ठरविण्याचे अधिकार कोणाला आहेत, शासनाच्या हमी भावापेक्षा बाजारात कमी भाव शेतकऱ्यांना मिळत असल्यास त्या वर शासन नेमके काय करणार, जर शासनाने हमी भावाने खरेदी चालु केली तर त्या वर २४ तासाच्या आत पैसे देण्याची तयारी राज्य किंवा केंद्र शासनाकडे आहे काय? तशी अर्थ संकल्पात तरतुद करण्यात आली आहे काय? आज सोयाबीनच्या हमी भावापेक्षा ७००/- ते ८००/- रुपयांनी सोयाबीन कमी भावाने बाजारात विकले जात आहे. या वर शासन काय करत आहे याची माहिती शेतकऱ्यांना मिळणे गरजेचे आहे. तसेच प्रधानमंत्री पीक विमा योजना या वर विमा कंपनी आपल्या जिल्ह्यासाठी कोणती, तिचे नाव काय?, त्यांचे कार्यालय कृषी प्रदर्शनात किंवा महोत्सवात असावे जेणे करुन शेतकऱ्यांना याची माहिती मिळेल. उदारणार्थ सांगायचे झाल्यास बीड जिल्ह्यात २०२३-२४ चा खरीप हंगाम ८० ते ९०% कमी पावसामुळे वाया गेला. त्या वर कृषीमंत्री म्हणत आहेत की ४०० कोटी रुपये विमा आपणाला मिळतोय. बीड साठी असणाऱ्या अग्रीकल्चर इन्शुरन्स कंपनीने सुरवातीला २५% अग्रीम म्हणून विमा काही शेतकऱ्यांना दिला परंतु पालकमंत्री यांनी आपला बीड जिल्हा दुष्काळात आहे असे जाहीर केले होते. विमा कंपनीने प्रत्येक पिकाचे उंबरठा उत्पादन किती दाखविले ? बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना कोणत्या पिकाला किती टक्के विमा दिला किंवा देणार या बद्दल गेल्या वर्षभरापासून शेतकऱ्यांना माहिती मिळत नाही. १(एक) रुपयात शेतकऱ्यांचा विमा भरून घेतल्या जातो त्या मध्ये राज्य शासनाचा भार किती व केंद्र शासनाचा हिस्सा किती राज्य व केंद्राचे एकूण किती रुपये कंपनीला मिळाले याची सविस्तर माहिती शेतकऱ्यांना मिळण्यासाठी कृषी महोत्सवामध्ये किंवा कृषी प्रदर्शनात विमा कंपनीचे माहिती कार्यालय असावे. ई-पीक पहाणी मध्ये ७० ते ८० टक्के शेतकऱ्यांना स्वतः सहभाग नोंदवता येत नाही. पिकाचे नुकसान झाले तरी विमा कंपनी ७२ तासाच्या आत आणि ई-पिक पहाणी शिवाय तक्रार घेत नाही. तसेच कृषी महोत्सवात पशु संवर्धन विभागाचे माहिती कार्यालय असावे. आज बीड जिल्ह्यात जनावरांच्या दवाखान्यात संडासची सुध्दा गोळी किंवा जखम झाल्यास आयोडिन औषधही मिळत नाही असे एक नाही तर अनेक विषय आपल्या समोर मांडता येतील असे मत भारतीय शेतकरी कामगार पक्षाचे बीड जिल्हा चिटणीस भाई विष्णुपंत घोलप यांनी आमच्या दैनिक लोकनेता प्रतिनिधीशी बोलतांना व्यक्त केले.



# पाटोदा शहरात साथीच्या रोगांचे थैमान नगर पंचायतने फवारणी करावी-राहुल जाधव

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पाटोदा । प्रतिनिधी**

गेल्या काही दिवसात पाटोदा शहारात व परिसरात वातावरण अत्यंत खराब झाले असून पाटोदा शहरासह परिसरातील नागरिक चांगलेच हैराण झाले आहे. पाटोदा ग्रामीण रुग्णालय व इतर खाजगी रुग्णालयात मलेरिया व इतर साथीच्या रूग्ण आढळून येत आहे. ही संख्या वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्या मुळे राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे पाटोदा तालुकाध्यक्ष राहुल शाहुराव जाधव यांनी आरोग्य विभाग पाटोदा व नगर पंचायत ला खबरदारीच्या उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. गेल्या आठवड्यात पाटोदा शहरात मोठ्या प्रमाणात पाऊस झाला असल्याने प्रचंड मच्छरांचा सुळसुळाट झाला असून दूषित पाण्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. त्यात डेंग्यू, मलेरिया सह इतर आजाराने डोके वर काढलेले असल्याने पाटोदा ग्रामीण रुग्णालय व खाजगी रुग्णालयात मध्ये प्रमाणात रुग्णांची संख्या वाढत आहे. या मुळे आरोग्य विभाग व पाटोदा नगर पंचायतने तातडीने आवश्यक त्या सुविधा पुरवाव्यात तसेच रुग्णांची गैरसोय होणार नाही याची काळजी घ्यावी. तसेच पाटोदा शहरात नगर पंचायतीने डासरोधक व जंतू नाशकांची फवारणी करावी. तसेच आजार थांबवण्याच्या दृष्टीने आवश्यक ते उपाययोजना व जनजागृती करावी. अशी मागणी राष्ट्रीय काँग्रेसचे पाटोदा तालुकाध्यक्ष राहुल शाहुराव जाधव यांनी केली आहे.



# त्या नराधमाला फाशीची शिक्षा द्या..बदलापूर घटनेचा निषेध म्हणून पोलीस ठाण्यामार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन;शेकडो ग्रामस्थांचा,शाळकरी मुलींचा सहभाग

**बदलापूरसह कोलकाता,अकोला, संभाजीनगर येथे महिला,मुलींवर अत्याचार झाल्याच्या घटना दुदैवी असून चीड आणणाऱ्या आहेत.शासनाने आता सदरील सर्व प्रकरण फास्ट ट्रॅक कोर्टात चालवून दोषींना सरळ फासावर लटकावले पाहिजे या मागणीसाठी आज मुख्यमंत्री यांना पोलीस ठाणे मार्फत निवेदन देण्यात आले आहे.शिवाय आता याबाबतचा कायदा देखील कडक करण्याची गरज असून माता,भगिनी,मुलींना सुरक्षित समाज देण्याची गरज आहे.यासाठी आता शासनाने विचार करण्याची गरज आहे.
श्री.जाबेर पठाण,जिल्हाउपाध्यक्ष केंद्रीय पत्रकार संघटना,जालना.**





■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**वालसावंगी । कौतिक हिवाळे**

ठाणे जिल्ह्यातील बदलापूर येथे दोन चिमुकल्या मुलींवर लैंगिक अत्याचार केल्याची माणुसकीला काळिमा फासणारी घटना उघड झाली अन महाराष्ट्रसह देशाच्या काळजाचा ठोका वाढला अत्यंत चीड आणि राग आणणाऱ्या या घटनेचा निषेध म्हणून तसेच त्या नराधमाला फास्ट ट्रक कोर्टात केस चालवून सरळ सरळ फाशीची शिक्षा देण्यात यावी या मागणीसाठी आज पारध पोलीस ठाण्यात वालसावंगी, पारध,धावडा,शेलुध,येथील सर्वधर्मीय,सर्वपक्षीय शेकडो ग्रामस्थांच्या उपस्थित,केंद्रीय पत्रकार संघ व पारध गावातील शाळेतील मुलींनी निषेध निवेदन मुख्यमंत्री महोदयांना सपोनि वैशाली पवार यांच्या मार्फत देण्यात आले..दरम्यान राज्यातील विविध शहरात सध्या महिलांवरील घडत असलेल्या अत्याचाराच्या घटना वाढत असून हे रोखण्यासाठी राज्य शासनाने कडक कायदा करावा जेणेकरून कायद्याचा धाक राहील व या लाजिरवाण्या घटना कमी होतील.यावेळी प्रा.संग्रामराजे देशमुख, लोकजागरचे केशव पाटील जंजाळ,पत्रकार विशाल असवार,मौलाना हफिस खलील यांनी भाषणातून सदरील घटनेबाबत निषेध व्यक्त केला.शाळकरी मुलींनी देखील सदरील आरोपींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.यावेळी वालसावंगी, पारधसह परिसरातील शेकडो युवक,ग्रामस्थ,पत्रकार बांधव उपस्थित होते.सूत्रसंचालन पत्रकार विकास लोखंडे यांनी केले तर आभार प्रदर्शन पत्रकार सागर देशमुख यांनी मानले.यावेळी पत्रकार मुस्तफा भाई, हरी बोराडे,जाबेर पठाण,नारायण हिवाळे,मिलिंद साळवे,खडके अप्पा,संदीप सुरडकर,तुकाराम फुसे,संदीप लोखंडे,राहुल कोथलकर,प्रवीण पवार,भगवान वाघ,सोफियान कादरी आदी उपस्थित होते.

**ठाण्यात घेतली शपथ**

दरम्यान निवेदन देतेवेळी उपस्थित शेकडो युवक,ग्रामस्थांनी महिलांच्या सुरक्षिततेची शपथ घेतली.आपण कुणाकडे वेगळ्या नजरेने न बघता आई,बहीण,लेक म्हणून महिलांकडे बघण्याचा दृष्टिकोन ठेवू कुणी जर नजरेदेखत छेड काढत असेल तर त्या स्त्रीच्या मदतीला जात,पात,धर्म न बघता धावून जाऊ असे या शपथ मध्ये नमूद केले असून केशव जंजाळ यांनी ही शपथ सर्वांना दिली असून सर्व गावात,शाळेत ही शपथ घ्यावी अशी विनंती त्यांनी केली आहे.

**फाशीच... एकच मागणी.**

दरम्यान ठाण्यात उपस्थित सर्वांच्या ओठावर केवळ आणि केवळ त्या सर्व नराधमांना फाशीच द्यावी याची मागणी होती. याबाबत युवक पेटून उठले होते.यासाठी पोलीस ठाण्यात तोबा गर्दी झाली होती.

# बोगस बियाणे नंतरही तो मागे नाही हटला नव्हता परत पेरणी करून पीक उभं केलं होतं-देवकर

## निसर्गाने मात्र सगळ पिक पाण्यात घातल-शेतकरी बांधवांच्या वेदना

## सगळ्यांची दिवाळी सारखी नसते रे, ऐन दिवाळीत आमचं दिवाळ निघलय

### ऐनवेळी पोट मारून पिकाला फवारणी,खुरपणी,पाणी दिल तेच पीक पाण्यात वाहून जाताना ज्या वेदना होतात त्या तुम्हाला-उच्या खोलीत बसून नाही समजणार साहेब










■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

बीड जिल्हातील आष्टी तालुक्यात आणि लोणी जिल्हा परिषद गटामध्ये भरपूर प्रमाणात पाउस झाल्याने सर्वच शिवारात पावसाचे पाणी साचून राहिल्याने अनेक ठिकाणी पिके सडू लागली आहेत.तर काही भागांत पिके आडवी होऊन नुकसान वाढत आहे.लोणी; पारोडी साकत आदी गावात तसेच आष्टी तालुक्याचा परिसरात जोरदार पाऊस होत असल्याने सोयाबीन मूग तुर यांना तसेच काही पिके व फळबागा व भाजीपाला या पिकांना मोठा तडाखा बसत आहे.सातत्याने पाणी शिवारात साचून राहिल्याने कंदवर्गीय भाजीपाला पिके सडू लागली आहेत.त्यामध्ये सर्वाधिक नुकसान फ्लॉवर व कोबी या पिकांचे आहे तर टोमॅटो पिके बुरशीजन्य रोगांच्या विळख्यात सापडली आहेत.

सलग दोन वर्षे दुष्काळाची गेली. खरिपाचा हंगाम अपुऱ्या पावसामुळे कसाबसा पार पडेल असे वाटले होते.पण परतीच्या पावसाने जे हाती आले तेही गमावावे लागले.होत्याचं नव्हतं झालं साहेब.अशी प्रतिक्रिया शेतकरी देत आहेत.

माझ्या तीन एकर सोयाबीनमध्ये पाणी शिरले आहे.आता हे सोयाबीन काढायचे म्हणले तर प्रति बॅग एकरी ४ हजार रुपये खर्च येतो.केवळ काढणीसाठी १२ हजार रुपये लागतात.पुन्हा उगवलेले तण नष्ट करण्यासाठीचा खर्च वेगळा.अशा स्थितीत उत्पादन तर काहीच नाही. खर्च कसा काढायचा,अशी व्यथा लोणी येथील एका शेतकरी बांधव यांनी मांडली.दरम्यान तालुक्यातील लोणी स शिवारात शेती करणारे शेतकरी अडचणीत आले आहेत.अतिवृष्टी व अवकाळी पावसामुळे अडीच एकरातील सोयाबीनचे पीक हातचे गेले.कौटुंबिक अडचणींसह मुलीच्या लग्नाबाबत ते चिंतेत अनेक शेतकरी आहेत.आष्टी तालुक्यात सलग दोन दिवस मुसळधार पावसामुळे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. प्रस्तुत लोणी गावामध्ये जाऊन पाहणी केली.सोयाबीनचा मोठा पेरा असणाजया या परिसरात आभाळच फाटल्याचे निदर्शनास आले.तीन दिवसांपूर्वी झालेल्या मुसळधार पावसाने सर्वत्र पाणीपाणी झाले.अनेकांच्या सोयाबीनमध्ये पाणी घुसले.पिके पाण्यावर तरंगू लागली.काढून ठेवलेली मूग व पिवळयाच्या ढिगार्याला आता कोंबे फुटली आहेत.पाऊस उघडल्यानंतर अनेक शेतकऱ्यांनी सोयाबीनचे पीक उन्हात वाळवायला ठेवले. मात्र,पुन्हा पाऊस आल्याने आहे ते ढिगारेही भिजून कुजून जाऊ लागले आहेत.सोमवारी तिसऱ्या दिवशीही अनेक शेतकऱ्यांच्या शेतामध्ये पाणी तसेच होते. सोयाबीनचे नुकसान मोठ्या प्रमाणात झाल्याचे दिसले.आता हे सोयाबीन काढायचे कसे? हा मोठा प्रश्न भेडसावू लागल्याचे पारोडी येथील शेतकऱ्यांनी सांगीतले.लोणी परिसरातील शेतांमध्ये लावलेला मूग ही भिजला.मुगात मोठ्या प्रमाणात पाणी शिरल्याने ही बिया फुगून त्या आतील कोंब आल्याचे सांगताना लोणी येथिल अनेक शेतकरी भावनिक झाले.आष्टी तालुक्यात अनेक शेतकऱ्यांचे नुकसान झाले असल्याचे लोकनेता ला सांगितले.पाऊस पडून तीन दिवस झाल्यानंतर लोकांनी प्रत्येक गावात तलाठी कार्यालयात पीकपाहणी व पंचनाम्यासाठी हजर झाले होते. तलाठ्यांना गराडा घालून आमची पाहणी करा अशी मागणी बरेचसे शेतकरी करत होते.अशी माहिती जनहितार्थ सामाजिक कार्यकर्ते बाबु भिमराव देवकर यांनी दिली.

## शिरुळ (कौठा) येथे साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**



कंधार तालुक्यातील शिरुळ येथे लोकशाहीर,साहित्यरत्न डॉ.अण्णाभाऊ साठे यांच्या १०४ व्या जयंतीनिमित्त लोहा-कंधार विधानसभा मतदारसंघाचे आमदार श्यामसुंदर शिंदे तसेच सामाजिक कार्यकर्त्या सौ.आशाताई श्यामसुंदर शिंदे यांचा हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.आशाताई यांचे शिरुळ नगरीत आगमन होताच फटाक्यांच्या आतिषबाजीने व औक्षण करून जंगी स्वागत करण्यात आले.

यावेळी प्रथम सौ.आशाताई शिंदे यांनी छत्रपती शाहु महाराज डॉ.बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या फोटोस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी लोकशाहीर अण्णा भाऊ साठे जयंती मंडळ कमिटी शिरुळ यांच्या वतीने सौ.आशाताई शिंदे व सोबत आलेल्या सर्व मान्यवर यांचा यथोचित सत्कार करण्यात आला.याप्रसंगी आझाद ग्रूपचे जिल्हाध्यक्ष प्रभाकर पांडे,माणिकराव पा.वाकडे संचालक कृषी उत्पन्न बाजार समिती लोहा, सरपंच सुधाकर पा.जाधव,डि.के.कांबळे,प्रताप देशमुख चेअरमन कौठा,सचिन पा.जाधव, सुधाकर सातपुते संचालक खरेदी विक्री संघ लोहा,नारायण नवघरे जयंती मंडळ अध्यक्ष शिरुळ,प्रदिप पा.हुंबाड,विठ्ठल पा.जाधव तंटामुक्ती अध्यक्ष शिरूर, व्यंकटराव पा.जाधव (स्वस्त धान्य दुकानदार),मारोती सुर्यवंशी उपाध्यक्ष जयंती मित्रमंडळ,व्यंकटराव गिरी,हानमंत कदम सरपंच चौकी महाकाय,राजु भंडारे सरपंच तेलुर,विशाल पा.कौशल्य,पिराजी नवघरे,मारोती नवघरे,महीला भगिनी व जयंती मित्रमंडळी सह मान्यवर उपस्थित होते.

## खडसेंचा भाजप प्रवेश अनाकलनीय; महाजनांचा खोचक प्रश्न

### एकनाथ खडसे नेमके आहेत तरी कुठे?

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

भाजपचे ज्येष्ठ नेते आणि महाराष्ट्रातील अनुभवी राजकारणी एकनाथ खडसे यांच्या संभाव्य भाजप प्रवेशावरून राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली आहे. मात्र, खडसे भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याची माहिती कुणालाच नाही, अशा खोचक शब्दात महाराष्ट्राचे मंत्री गिरीश महाजन यांनी खडसेंना टोला लगावला आहे.

महाजन म्हणाले, एकनाथ खडसेंनी भाजपमध्ये प्रवेश केला असल्याची बातमी समोर येत आहे, पण याबाबत कुणालाच काही ठोस माहिती नाही. राष्ट्रवादी काँग्रेसचा राजीनामा दिला याची सुप्रिया सुळे, जयंत पाटील, शरद पवार यांनाही माहिती नाही. नेमकं काय चाललंय हे एकनाथ खडसेंनाच विचारा, तेच याची खरी माहिती देऊ शकतील.

त्याच वेळी, बदलापूर आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर बोलताना, महाजन यांनी आंदोलकांवर टीका केली. जरांगे पाटील यांच्या आंदोलनातील पोस्टर्स आणि बॅनर्स राजकीय असल्याचे दिसत आहेत, पण आंदोलनाचे गांभीर्य लक्षात घेतलं नाही, असे महाजन म्हणाले. त्यानंतर त्यांनी संजय राऊत आणि सुषमा अंधारे यांच्या टीकेलाही प्रत्युत्तर दिले. महाजन यांनी सांगितले की, बदलापूर प्रकरणाची केस फास्टट्रॅक कोर्टात दाखल करण्यात आली आहे. या प्रकरणात दोषी असलेल्या पोलिस अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात आले आहे. तसेच, आरोपींवर कठोर कारवाई होईल याची पूर्ण खात्री आहे.शाळांमध्ये सीसीटीव्ही बसवण्याचे आदेश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्याचेही महाजन यांनी स्पष्ट केले. शाळांमध्ये अशा घटनांना आळा घालण्यासाठी सीसीटीव्ही एक प्रभावी उपाय असू शकतो, असे महाजन म्हणाले. या प्रकरणात एकनाथ खडसे यांच्या राजकीय निर्णयाविषयी आणि बदलापूर प्रकरणाच्या हाताळणीविषयी अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. या सर्व बाबींवर महाजनांच्या प्रतिक्रिया चर्चेत राहतील, हे निश्चित आहे.

## ड्रोन पासून धोका नाही,चो-या होत नाहीत नागरिकांनी घाबरु नये अफवा पसरवू नये पोलिस अधिक्षक (एसपी) अविनाश बारगळ यांचे आवाहन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**



बीड पोलिसांनी ड्रोन कंपनीशी केला संपर्क बीड,सह अन्य या जिल्ह्यात अनेक ठिकाणी ड्रोन घिरट्या घालत असल्याचे पहायला मिळत आहे.आष्टी तालुक्यात ही अनेक गावात ड्रोन चे व्हिडिओ नागरीकांनी घेतले आहेत.या ड्रोनच्या माध्यमातून चोऱ्या केल्या जात असल्याची अफवा पसरविली जात आहे.यातून मारहाणीच्या घटनाही घडत आहेत.याच सर्व घडामोडीची तात्काळ दखल घेवून पोलिस अधीक्षक अविनाश बारगळ यांनी ड्रोनच्या कंपन्यांशी संपर्क साधला आहे.त्यामुळे नागरिकांनी घाबरू नये,अफवा पसरू नये,त्या ड्रोनपासून कुणालाही धोका नाहे,

याचा सखोल तपास बीड पोलिस करत आहे.असे आवाहन पोलिस अधिक्षक ( एसपी ) अविनाश बारगळ यांनी केले आहे.

## हिंगोली जिल्ह्याच्या सिंचन व वीज अनुशेष प्रश्न बाबत आ.तानाजीराव मुटकुळे यांनी घेतली राज्यपाल श्री सी.पी.राधाकृष्णन यांची भेट

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सेनगाव । महादेव हरण**

हिंगोली विधानसभेचे आमदार तानाजीराव मुटकुळे यांनी महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल श्री सि ,पी ,राधाकृष्णन यांची भेट घेऊन हिंगोली जिल्ह्याच्या सिंचन अनुशेष २०१७ सली परभणी जिल्ह्यातून वेगळा करून मान्य करण्यात आला होता त्या अनुसंघाने बऱ्याच प्रमाणात सिंचनाची कामे झाली परंतु बरीच कामे कर्मचाऱ्यांच्या अभावामुळे बंद पडत आहेत मोठ्या प्रमाणात रिक्त पदे भरण्यात यावी अशी मागणी केली त्यावेळी सोबतच सिंचन विहिरी २२००० करण्यासंदर्भात भूजल सर्वेक्षण कार्यालय पुणे यांनी अभिप्राय दिला होता परंतु प्रत्यक्षात फक्त पाच हजार विहिरी पूर्ण झाल्या आहेत त्याच बरोबर सिंचन वाढल्यामुळे विजेचाही तूतोडा भासत आहे या विजेची अनेक केंद्रे मंजूर करून द्यावी अशी मागणी केली यावेळी कैलास काबरा नगरसेवक राजू गोटे अमित प्यारेवाल व आदी कार्यकर्ते उपस्थित होते,



## मा.डॉ.कैलास मोते साहेब यांचा आष्टी तालुका दौरा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**



राज्याचे संचालक फलोत्पादन मा.डॉ.कैलास मोते साहेब यांनी आष्टी तालुक्यातील धनगरवाडी व धामणगाव येथील कृषी विभागाच्या विविध योजनेतून फळबाग लागवड केलेल्या शेतकऱ्यांच्या शेतावर भेटी दिल्या.त्याचप्रमाणे ठिबक संचाची तपासणी केली.

यावेळी आयुक्तालयातील तंत्र अधिकारी सचिन मोरे उपविभागीय कृषी अधिकारी बीड मा.उद्धव गर्जे,तालुका कृषी अधिकारी आष्टी श्री गोरख तरटे, मंडळ कृषी अधिकारी अर्जुन सुर्यवंशी कृषी पर्यवेक्षक प्रशांत धस,अशोक चव्हाण,कृषी सहायक वैशाली मुळे,स्मिता झिने,सचिन सव्वासे,उषा हुमे व शेतकरी अमोल चौधरी,विलास गोल्हार, हनुमंत कण्हेरकर इत्यादी उपस्थित होते





बितनाळ येथिल बाजीराव पा.उमाटे (सरपंच मारोतराव पा. उमाटे यांचे मोठे बंधू) नांदेड येथील खाजगी रुग्णालयात उपचार घेत असल्याचे समजताच यांच्या प्रकृतीची पाहणी करण्यासाठी अपेक्षा हॉस्पिटल नांदेड येथे गेले असता मा.मारोतराव पाटील कवळे गुरुजी यांचा डॉ.अर्जुन शेळके, डॉ.संजय पतंगे,डॉ.सुनील शेट्टी सर यांनी सन्मान केला व गुरुजींनी यावेळी बाजीराव पाटील उमाटे यांच्या प्रकतीबद्दल विचारपूस केली.

# ७ वर्षीय कल्पेश खंडारे ह्याने मिळवले एमटीएस ऑलंपियाड शासनमान्य राज्यस्तरीय स्पर्धा परीक्षेत रौप्य पदक


■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बुलढाणा | प्रतिनिधी**

प्राथमिक शाळेपासून विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेची माहिती व्हावी आवड निर्माण व्हावी याकरिता एमटीएस ऑलंपियाड महाराष्ट्र शासन मान्य राज्यस्तरीय स्पर्धा परीक्षा चे आयोजन करण्यात येत असते,यासाठी बुलढाणा जिल्ह्यातून परीक्षा केंद्र हे जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा शिंदी येथे असते सदर सर्व स्पर्धा परीक्षेला मार्गदर्शन सहाय्यक शिक्षक सोमनाथ लोमटे हे करत असतात,आणि त्यांच्या मार्गदर्शनाखाली एमटीएस ची परीक्षा सन २०२३ - २४ पार पडली होती ,जिल्हाभरातून अनेक विद्यार्थी यामध्ये सहभागी होते, स्पर्धा परीक्षेमध्ये ७ वर्षीय विद्यार्थी कल्पेश सचिन खंडारे हा सुद्धा सहभागी झाला होता .

विशेष म्हणजे पहिल्या वर्गात असल्यामुळे अक्षरांची ओळख सुद्धा त्याला झाली नव्हती परंतु घरी सराव करत लोमटे सर यांच्या मार्गदर्शनाखाली तो पहिल्या वर्गातून उत्तीर्ण झाला व त्याला १५ ऑगस्ट रोजी शालेय समितीचे अध्यक्ष गोपाल खरात,माजी सरपंच शिवसेना जेष्ठ नेते गंभीरराव खरात,सरपंच सौ साधना अशोक खरात,त्याचबरोबर तंटामुक्तीचे अध्यक्ष शेषराव बंगाळे सचिव दिनकर काळे,अशोक खरात,

उपाध्यक्ष पंजाब मोरे यांच्या हस्ते सिल्वर मेडल प्रमाणपत्र शाल श्रीफळ पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले, १ वर्गामध्ये कल्पेश सचिन खंडारे सिल्वर मेडल,साई सोमनाथ लोमटे गोल्ड,वर्ग दुसरी मधून स्वरा अनिल येरमुले,चेतन शिवदास खरात सिल्वर, जुई ज्ञानेश्वर बंगाळे ब्राँझ, वर्ग ३ रीतून खुशी छगन चांदोरे गोल्ड,अविष्कार ज्ञानेश्वर भांड सिल्वर,धनश्री श्रीधर इंगळे ब्रांझ,आरव प्रदीप खरात ब्रांझ, फाल्गुषी संतोष साळवे ब्राँझ,हर्षल समाधान मोरे ब्राँझ,शिवदास गोपाल खरात,ब्रांझ,नम्रता रवी वाघमारे ब्राँझ, ४ वर्गामधुन यशोदीप सुनील कराळे गोल्ड,सुरज रवींद्र गवई सिल्वर,संस्कृती नितेश खरात सिल्वर, रोहित शरद खरात सिल्वर,ज्ञानेश्वर संदीप इंगळे ब्रांझ,ज्ञानेश्वरी अंकुश खरात ब्रांझ,तेजस्विनी कृष्णगिर गिरी ब्राँझ,प्रणव श्रीधर खरात ब्राँझ, ६ व्या वर्ग मधून ऋतिक पद्माकर खरात गोल्ड , प्रीती बळीराम गवई गोल्ड,विकी रमेश गवई सिल्वर,प्रीती गोपाल खरात गोल्ड,समीक्षा प्रदीप खरात सिल्वर,साक्षी विलास तोडे,ब्रांझ,सुजाता शिवदास खरात ब्रांझ , खुशी ज्ञानेश्वर बंगाळे ब्रांझ यांच्यासह अनेक विद्यार्थ्यांना यावेळी पदक प्राप्त झाले आहे,कल्पेश यांना पहिल्या वर्गामध्ये रोजचे पदक मिळाल्यामुळे परिसरातून त्याच्यावर अभिनंदनाचा व कौतुकाचा वर्षाव होत आहे .



# राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाची जनसन्मान यात्रा आज इंदापूर मध्ये

## मोठ्या संख्येने जन सन्मान यात्रेला उपस्थित राहा-आमदार दत्तात्रय भरणे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**इंदापूर | बबनराव धायतोंडे**

राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाची जन सन्मान यात्रा शुक्रवार दि. २३ ऑगस्ट रोजी इंदापूर तालुक्यात येणार आहे. या जन सन्मान यात्रेत इंदापूर तालुक्यातील सर्व महिला भगिनी पुरुषवर्गाने व सर्व युवकांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते व इंदापूर तालुक्याचे लाडके आमदार दत्तात्रय भरणे यांनी केले आहे.




काल दि. २१ ऑगस्ट रोजी पुणे जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या सभागृहात आमदार दत्तात्रय भरणे यांच्याकडून पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आमदार दत्तात्रय भरणे बोलत होते.यावेळी बोलताना आमदार दत्तात्रय भरणे यांनी सांगितलं की महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री अजित पवार यांनी इंदापूर तालुक्यासाठी भरीव निधीची तरतूद केलेली आहे. चालू आर्थिक वर्षाच्या बजेटमध्ये भरीव निधीची तरतूद करून इंदापूर तालुक्याला मोठा न्याय दिलेला आहे.माझी लाडकी बहीण योजनेचा इंदापूर तालुक्यातील लाडक्या बहिणी,लाडका भाऊ,शेतकरी वर्गाला विजबिल माफी या योजनेचा मोठा फायदा होणार आहे.हे बजेट इंदापूर तालुक्यासाठी एक वरदानच ठरले आहे.हा निधी मिळविण्यासाठी आमदार दत्तात्रय भरणे यांनी वेळोवेळी पाठपुरावा केलेला होता.यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते विविध विकास कामांचे भूमिपूजन होणार आहे व जुनी मार्केट कमिटी इंदापूर या ठिकाणी भव्य जाहीर सभेचे आयोजन करण्यात आलेले आहे. येणाऱ्या विधानसभेच्या जागावाटपाच्या पार्श्वभूमीवर अजित पवार काय भाष्य करणार हे पाहणं महत्त्वाचं ठरेल.पक्षाध्यक्ष अजित पवार यांचे विचार जनसमान यात्रेच्या निमित्ताने ऐकण्यासाठी इंदापूर तालुक्यातील सर्व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आमदार दत्तात्रय भरणे यांनी केले आहे.

# कंधार तालुक्यात सोयाबीन, कापूस अनुदानाच्या यादीत घोळ

## ७/१२ वर नोंद असलेल्यांची नावे गायब

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार | धोंडीबा मुंडे**

कंधार तालुक्यात सोयाबीन,कापूस अनुदानाच्या यादीत घोळ झाला आहे, ७/१२ वर नोंद असलेल्यांची नावे गायब राज्य शासनाच्या वतीने मागील वर्षी सन २०२३ साली खरीप हंगामात सोयाबीन,कापूस ही पिके घेणाऱ्या शेतकऱ्यांना हेक्टरी ५ हजार रुपये, २ हेक्टर पर्यंत अनुदान जाहीर केले,त्यात पात्र लाभार्थी शेतकऱ्यांची नावे प्रकाशीत करण्यात आलेल्या यादीतून काही पात्र शेतकऱ्यांना ही वगळण्यात आले,असून यादीत १- १ शेतकऱ्यांची नावे दोन-दोन तीन-तीन वेळेस आलेल्याने यादी मध्ये मोठा घोळ व चूका झाल्याने कंधार तालुक्यातील परिसरातील अनेक शेतकरी या योजनेपासून वंचित रहाण्याची वेळ आली आहे,

राज्य पुरस्कृत मूल्य योजने अंतर्गत हेक्टरी ५ हजार रुपये अनुदान २ हेक्टरपर्यंत देण्याचे राज्य शासनाने जाहीर केले.

या योजनेच्या याद्याही प्रत्येक गावांतील ग्रामपंचायत कार्यालयात प्रकाशित करण्यात आल्या. मात्र कंधार तालुक्यातील प्रत्येक गावांतील याद्यांमध्ये मोठा घोळ दिसून येत,

राज्य पुरस्कृत मूल्य योजने अंतर्गत हेक्टरी ५ हजार रुपये अनुदान २ हेक्टरपर्यंत देण्याचे राज्य शासनाने जाहीर केले.या योजनेच्या याद्याही प्रत्येक गावांतील ग्रामपंचायत कार्यालयात प्रकाशित करण्यात आल्या.मात्र कंधार तालुक्यातील प्रत्येक गावांतील याद्यांमध्ये मोठा घोळ दिसून येत,

# बदलापूर नंतर दौंड तालुक्यातील मळद येथे विद्यार्थिनींवर लैंगिकक अत्याचार

## खा.सुप्रिया सुळे,मा.आमदार रमेश थोरात मळद येथे घटनास्थळी भेट देणार




■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**दौंड | बबनराव धायतोंडे**

बदलापूर येथे अल्पवयीन विद्यार्थिनीवर लैंगिक अत्याचार केल्याची घटना ताजी असतानाच दौंड तालुक्यातील मळद येथील माध्यमिक विद्यालयामध्ये शिक्षकांनी विद्यार्थिनींचे लैंगिक शोषण केल्याची घटना उघडकीस आली आहे.या घटनेने पुन्हा एकदा महाराष्ट्र हादरून गेला आहे. दौंड तालुक्यातील मळद येथील माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक सुभाष भिमराव वाखारे आणि शिक्षक बापूराव साहेबराव धुमाळ या दोघांवर दौंड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या विद्यालयातील शिक्षकांनी शालेय विद्यार्थिनींना व्हाँट्सअँप वर अश्लिल मेसेज पाठवणे,व्हिडिओ कॉल करून अश्लील हावभाव करणे,अभ्यास आणि शिकविण्याच्या नावाखाली ब्लॅकमेल करत लैंगिक शोषण केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.या शिक्षकांकडून विद्यार्थीनींना ब्लॅकमेल करून लैंगिक शोषण केल्याचा आरोप केला जात आहे. या घटनेने परिसरात तणाव निर्माण झाला असून पालकांनी संबंधित शिक्षकांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. घटनेची माहिती मिळताच दौंड पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. या प्रकरणी मुख्याध्यापक सुभाष वाखारे व शिक्षक बापूराव धुमाळ यांच्यावर दौंड पोलीस ठाण्यात लैंगिक अत्याचार व पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मळद येथील शाळेच्या घटनास्थळी बारामती लोकसभेच्या खासदार सुप्रिया सुळे आणि दौंड चे माजी आमदार रमेश थोरात भेट देणार आहेत.अशी माहिती सूत्रांनी दिली.या घटनेचा पुढील तपास दौंड पोलीस करीत आहेत.

# भीमराव धोंडे यांच्या मागणीची मुख्यमंत्री व पालकमंत्र्यांकडून दखल

## ई-पीक पाहणीची अट रद्द

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी | अण्णासाहेब साबळे**

राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या कडून माजी आ.भीमराव धोंडे यांच्या मागणीची दखल घेत ई- पीक पाहणीची अट रद्द करण्यात आली आहे.भीमराव धोंडे यांच्या मागणीची मुख्यमंत्री व पालकमंत्र्यांकडून दखल घेत ; ई-पीक पाहणीची अट रद्द झाली आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.शेतकऱ्यांना सरसकट अनुदान मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. कधी अतिवृष्टी तर दुष्काळी परिस्थितीमुळे आष्टी, पाटोदा, शिरूर विधानसभा मतदार संघातील शेतकरी सतत आर्थिक संकटात सापडतो.यावर्षी देखील जिल्ह्याच्या अनेक भागात अतिवृष्टीने पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.



परंतु अनुदान मिळण्यासाठी शासनाने ई पिक पाहणीची जाचक अट घातली होती. ई - पिक पाहणी सर्वच शेतकरी करु शकत नाहीत.सर्वच शेतकऱ्याकडे अँड्रॉइड मोबाईल नाहीत. ग्रामीण भागात मोबाईल रेंजचा प्रश्न उद्भवतो,सर्व्हर डाऊनचाही प्रश्न निर्माण होतो त्यामुळे सर्व शेतकरी ई -पिक पाहणी करू शकत नाहीत. किमान ५० टक्के शेतकरी ई - पीक पाहणी करु शकले नाहीत त्यामुळे ते अनुदानापासून वंचित होते.माजी आ.भीमराव धोंडे यांनी सर्व सामान्यांच्या समस्या जाणून घेण्यासाठी १० जुलै २०२४ पासून मतदार संघात जनसंपर्क अभियान सुरू केले. यामध्ये अनेक वाड्या वस्त्यां वरील शेतकऱ्यांनी ई - पिक पाहणीची जाचक अट रद्द करुन सरसकट अनुदान द्यावे अशी मागणी केली होती. शेतकऱ्यांच्या मागणीची माजी आ.भीमराव धोंडे यांनी गांभीर्याने दखल घेत शासनाकडे मागणी केली होती.सर्व वर्तमानपत्रांतून बातम्या प्रसिद्ध झाल्या होत्या. सोशल मीडियावरुन सर्वत्र व्हायरल झाल्या होत्या.माजी आ.भीमराव धोंडे यांनी ई -पीक पाहणीची अट रद्द करून सरसकट अनुदान द्यावे अशी मागणी केली होती.गेल्या आठ दिवसापासून ही मागणी सर्वत्र वर्तमानपत्रांमध्ये गाजत आहे.दोन दिवसांपूर्वी परळी येथे कृषी महोत्सवाच्या निमित्ताने केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान,मुख्यमंत्री एकनाथ शिंदे,उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,उपमुख्यमंत्री अजित पवार,पालकमंत्री धनंजय मुंडे, लोकनेत्या आ.पंकजाताई मुंडे उपस्थित होत्या.यानिमित्ताने पालकमंत्री धनंजय मुंडे, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ई -पिक पाहणीची अट रद्द करण्याची घोषणा केली.त्यामुळे सर्वसामान्य शेतकऱ्यांना आता सरसकट अनुदान मिळणार आहे.सर्वप्रथम ही मागणी माजी आ.भीमराव धोंडे यांनीच लावून धरल्याने ती पूर्णत्वास गेली आहे.

# इंदापूर महाविद्यालयात क्रिडा व रांगोळी स्पर्धेचे आयोजन;२७२ विद्यार्थ्यांनी स्पर्धेत घेतला सहभाग

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**इंदापूर | बबनराव धायतोंडे**

इंदापूर येथील कला,विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयामधील कनिष्ठ महाविद्यालयात क्रिडा, सांस्कृतिक व छडड विभागाने राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष,माजी मंत्री व संस्थेचे अध्यक्ष मा.श्री.हर्षवर्धनजी पाटील' यांच्या वाढदिवसानिमित्त मंगळवार,दिनांक २० ऑगस्ट २०२४ रोजी क्रिडा व रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जीवन सरवदे यांनी केले.




यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते म्हणाले, संस्थेचे अध्यक्ष माजी.मंत्री हर्षवर्धन पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त महाविद्यालयात असे कार्यक्रम आयोजित केले जातात.क्रिडा व सांस्कृतिक उपक्रमातून विद्यार्थ्यांची कौशल्ये विकसित होतात.मैदानी खेळातून गुणवान खेळाडू तयार होतात.तसेच रांगोळी स्पर्धेतून अनेक कलाकार तयार होऊन नवनवीन विचार मांडले जातात.शालेय शिक्षणासोबत क्रीडा व सांस्कृतिक उपक्रमातून विद्यार्थी घडतात.त्यामुळे असे उपक्रम प्रेरणादायी असतात.

सदर उपक्रमात क्रिडा विभागाने व्हॉलीबॉल, आट्यापाट्या,कबड्डी,खो-खो,गोळाफेक याचे आयोजन केले.त्यात २७२ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.तसेच रांगोळी स्पर्धेत संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांची रांगोळीद्वारे प्रतिमा साकारण्यात आली होती.तसेच सामाजिक संदेश देणाऱ्या रांगोळी काढल्या होत्या.यात ५१ विद्यार्थीनींनी सहभाग घेतला.सदर उपक्रम महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.दत्तात्रय गोळे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित केला होता.स्पर्धा यशस्वी होण्यासाठी प्रा.सुनिल सावंत,क्रीडा विभाग प्रमुख,प्रा.बापू घोगरे,एन.एस.एस.विभाग प्रमुख सुवर्णा जाधव,प्रा.कल्पना भोसले मॅडम प्रा. धन्यकुमार माने,प्रा.शरद पवार,प्रा.हर्षवर्धन सरडे, प्रा.कल्याणी देवकर यांनी उपक्रमात सक्रिय सहभाग घेतला.तसेच कनिष्ठ विभागातील प्रा. भारत शेंडे,प्रा.संतोष पानसरे,प्रा.अमोल मगर,प्रा. रोहिदास भांगे,प्रा.युवराज फाळके,प्रा.भाऊ सकुंडे, प्रा.रवींद्र हगवणे,प्रा.राजीव शिरसट,प्रा.सागर गुजराथी,प्रा.अभिजीत भोसले,प्रा.आबाजी घोळवे यांनी मोलाचे सहकार्य केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन क्रिडा विभाग प्रमुख प्रा.बापू घोगरे यांनी केले आणि प्रा.शरद पवार यांनी आभार मानले.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४
This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904